I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 401-404
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या व्यवस्थापनात मानवीय संसाधनांचे महत्व

श्वेता शिरीष गुंडावार
गृहअर्थशास्त्र विभाग सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
*Corresponding Author: gundawarshweta@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :-**

कौटुंबिक ध्येये गाठण्यासाठी व्यवस्थापन करणे नेहमीच आवश्यक असते. ध्येये पूर्ण झाली की, समाधानाची प्राप्ती होवून जीवनात आनंद निर्माण होतो. अशा या कौटुंबिक ध्येयाच्या पूर्ततेसाठी जी व्यवस्थापन प्रक्रिया उपयोगात आणल्या जाते ती गृहव्यवस्थापन प्रक्रिया होय. त्या प्रक्रियेत नियोजन, नियंत्रण व मुल्यांकन अशा तीन पायऱ्यांचा समावेश होतो व या तीनही पायऱ्यामध्ये काम करीत असताना विविध संसाधनांचा वापर केल्या जातो ही संसाधने मर्यादित असल्याने ती वाया जावू नये व तिचा वापर योग्य व्हावा म्हणून योग्य ते निर्णय घ्यावे लागतात. अशी संसाधने दोन प्रकारची असतात; १) मानवीय २) अमानवीय. नौकरी करणाऱ्या स्त्रियांनी गृहव्यवस्थापन साधत असताना अमानवीय संसाधानांबरोबर मानवीय संसाधनांचा वापर केल्यास कमी खर्चामध्ये कामाची पूर्तता होते व पैसा हे अमानवीय संसाधन दुसऱ्या कार्यासाठी उपयोगात आणता येते.

## प्रस्तावना :-

स्त्री ही नौकरी करणारी किंवा घरकाम करणारी असो, प्रत्येकीचेच काही ध्येये असतात; मग ती ध्येये कुटुंबाशी संबंधित किंवा स्वतःच्या विकासाशी संबंधित असोत. अशा या दोन्ही प्रकारच्या ध्येयाची पूर्तता करीत असताना तिला विविध साधनांचा वापर करावा लागतो. ध्येयाची पूर्तता झाली की, समाधानाची प्राप्ती होते व समाधान प्राप्त झाले की, आनद मिळून कुटुंब सुखी व समाधानी होते. घरातील समाधानी वातावरणामुळे घरातील सर्वच व्यक्तींची कार्यक्षमता वाढून कुटुंबाचा विकास होतो व यशाची प्राप्ती होत असते. यशप्राप्ती झाली की, पुन्हा समाधान प्राप्त होते व असे यशदायी चक्र कुटुंबात सुरु राहते.

परंतु हे यशदायी चक्र सतत सुरु ठेवण्यासाठी किंबहुना ध्येये प्राप्त करण्यासाठी ज्या संसाधनांचा वापर केल्या जातो ती संसाधने मर्यादित असतात. अशी ही मर्यादित संसाधने एकदा नाश पावली की, पुन्हा ती पाहिजे असल्यास ती उपलब्ध करावी लागतात. म्हणूनच त्यांचा वापर काळजीपूर्वक करावा लागतो. हा वापर काळजीपूर्वक होण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रिया अवलंबावी लागते. अशा या व्यवस्थापन प्रक्रियेचा अवलंब करीत असताना त्याच्या प्रत्येक पायरीवर विविध संसाधनाचा वापर करताना विविध निर्णय घ्यावे लागतात. म्हणूनच व्यवस्थापनात निर्णयाची शृंखलाच असते असे म्हंटल्या आहे. व्यवस्थापनात कोणती संसाधने वापरावयाची या विषयी निर्णय घेताना संसाधानाविषयी माहिती असणे आवश्यक असते.

मेकलोक आणि डेकन यांच्या मते, “गरजा भागविण्याचे सुप्त सामर्थ्य आणि उपलब्ध असलेली साधने म्हणजे संसाधने होय. गरजा भागविणारी शक्ती म्हणजे संसाधने होय.” (क्षमा लिमये- गृहव्यवस्थापन व गृहकला विद्या प्रकाशन पान नं २५)

“मानवाच्या गुणवत्तेशी संबंधित साधनांना मानवीय संसाधने म्हणतात.” ही साधने दिसत नाही तर,

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 401-404 e-ISSN 2347 – 517X
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article

त्यांचा अनुभव घेता येतो. म्हणूनच या साधनांना अमूर्त साधने म्हणतात." (त्रिवेणी फरकाडे-कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन, पिंपळापुरे & पब्लिशर्स पान नं ३३)

"संसाधने दोन प्रकारची असतात.

| अनु.क्र. | मानवीय संसाधने | अमानवीय संसाधने |
|---|---|---|
| 1 | उर्जा / शक्ती | पैसा |
| २ | योग्यता , कौशल्ये | भौतिक साधने- वाहन, स्थावर वस्तू, कपडे, भांडी, फर्निचर इ. |
| ३ | आवड / रुची | सामुदायिक सेवा- शिक्षण संस्था, आरोग्य संस्था, दळणवळणाचे मार्ग, सामाजिक केंद्र, मनोरंजनाच्या सोयी इ. |
| ४ | मनोवृत्ती | आर्थिक व्यवहार केंद्र |
| ५ | वेळ | |

(गृह व्यवस्थापन आशा निमकर व क्षमा लिमये पान नं ६२ ते ६६)

**उद्‌दिष्टे :**

१) नौकरी करणाऱ्या स्त्रियांमधील व्यवस्थापना विषयीची जागरुकता जाणून घेणे.


२) कौटुंबिक व्यवस्थापनात मानवीय संसाधनांविषयी स्त्रियांमधील जागरुकता जाणून घेणे.

गृहीतकृत्ये:

१) नौकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये व्यवस्थापनाविषयी जागरुकता आहे.

२) मानवीय संसाधनां विषयी स्त्रियांमध्ये जागरूकता आहे.

नौकरी करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या व्यवस्थापनात कोणत्या प्रकारच्या संसाधनांचा वापर जास्त करतात. त्यांना व्यवस्थापन म्हणजे काय, व्यवस्थापन करताना निर्णय कसे घेतले जातात, ते का घ्यावे लागतात, संसाधनाची वैशिष्टे कोणती आहेत. हे सर्व नौकरी करणाऱ्या स्त्रियांना माहित असल्यास कामाची पूर्तता करताना थकवा येत नाही व कामाची गुणवत्ता वाढून काम पूर्ण होते व ध्येयाची पूर्तता होते आणि ह्याचा परिणाम कौटुंबिक वातावरणावर चांगला होतो व घरात तसेच कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहून त्यांची कार्यक्षमता वाढून त्यांचा विकास घडून येईल. स्त्रियांमधील ह्याच व्यवस्थापन विषयीची जागरूकता जाणून घेण्यासाठी चंद्रपूर शहरातील नौकरी करणाऱ्या स्त्रियांचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये ज्या स्त्रिया महिन्याची मिळकत भरपूर असल्याने पैसा या अमानवीय संसाधनांचा वापर करून घरकाम करतात व ज्या स्त्रिया मानवीय संसाधने वापरून कार्याची पूर्तता करतात अशा दोन्ही प्रकारच्या स्त्रिया अभ्यासासाठी निवडण्यात आल्या. अशा दोन्ही प्रकारच्या स्त्रिया मिळून ५० महिलांचा अभ्यास करण्यात आला. ही माहिती गुगल फॉर्म च्या सहाय्याने गोळा करण्यात आली तेव्हा असे आढळले की,




गुगल फॉर्म द्वारे गोळा करण्यात आलेल्या महितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आलेख

फक्त १६% नौकरी करणाऱ्या स्त्रिया स्वतःजवळील मानवीय संसाधनांविषयी जागरूक होत्या, त्यांनाच मानवीय संसाधने म्हणजे काय? ती कोणकोणती असतात याविषयी माहिती दिसून आली. त्यामुळे त्या कार्याच्या पूर्ततेसाठी मानवीय संसाधनांचा वापरत करीत असताना आढळून आल्या. तर, ८४% स्त्रिया मानवीय संसाधानंविषयी अनभिज्ञ होत्या. पण त्यांना संसाधानंविषयी माहिती देण्यात आली त्यावेळी नकळत जवळपास ८०% स्त्रीया संसाधनांचा वापर करीत असल्याचे दिसून आले. ही संसाधने योग्य प्रकारे कशी हाताळावीत किंवा वापरावीत ह्याचे ज्ञान नसल्याने त्यांना थकवा येत होता व कामाची गुणवत्ता पण कमी झालेली दिसून आली. फक्त ४% स्त्रिया मानवीय संसाधनांचा वापर करीत नव्हत्या. तर, १६% स्त्रिया कधीकधीच मानवीय संसाधनांचा वापर करीत होती.

घर व नौकरी अशा दोन्ही ठिकाणी मानवीय संसाधनांची कमतरता भासणाऱ्या ६०% स्त्रिया आढळून आल्या तर, २४% स्त्रियांना या संसाधनांची कमतरता भासत नव्हती. कारण त्या त्यांची कामे इतरांकडून करवून घेत होत्या. १६% स्त्रियांना ह्या संसाधनांची कमतरता कधीकधी भासत होती कारण त्या काही कामे इतरांकडून करवून घेत होत्या तर, काही स्वतः करीत होत्या.

ध्येयाच्या पूर्ततेसाठी निर्णय घेताना निर्णय प्रक्रियेचा अवलंब करणाऱ्या फक्त १६% स्त्रिया आढळल्या तर, ७०% स्त्रीया निर्णय प्रक्रियेचा अवलंब न करता निर्णय घेत होत्या. पण ज्या स्त्रिया निर्णय प्रक्रियेचा अवलंब करून निर्णय घेत होत्या त्यांच्यात निर्णय प्रक्रियेचा वापर न करणाऱ्या स्त्रियांच्या तुलनेत जास्त आत्मविश्वास दिसून आला. तर, १४% स्त्रिया कधीकधी निर्णय प्रक्रियेचा अवलंब करीत होत्या. जसे, लग्न, मुलांचे उच्च शिक्षण अशा कामांसाठी त्या निर्णय प्रक्रियेचा वापर करताना आढळून आल्या.

वेळ व उर्जेची कमतरता भासणाऱ्या ७८% स्त्रिया आढळून आल्या कारण त्या सर्व कामे स्वतःच करीत होत्या तर, २०% स्त्रियांना वेळ व उर्जेची कधीकधी कमतरता भासत होती फक्त २% स्त्रियांना वेळ व उर्जेची कमी भासत नव्हती कारण त्या त्यांची कामे नौकरांकडून करवून घेत होत्या.

२०% स्त्रियांकडे घरकामासाठी नौकर होते तर, ६८% स्त्रियांकडे घरकामासाठी नौकर नव्हते त्या घरकाम स्वतःच करीत होत्या. तर, १२% स्त्रिया काही कामे नौकरांकडून कडून करवून घेत होत्या. ज्या स्त्रिया नौकरांकडून कामे करवून घेत होत्या त्यांना वेळ व उर्जेची कमी भासत नव्हती व घरकाम व नौकरीचे काम अशी दोन्ही कामे करताना तारांबळ उडत नव्हती पण त्या थकत होत्या तर, ज्या स्त्रिया कामे स्वतःच करीत होत्या त्यांची घर व कामाचे ठिकाण अशा दोन्ही ठिकाणी कामे करताना तारांबळ होत होती आणि त्या जास्त थकलेल्या आढळून आल्या. नौकरांचे सहाय्य व सोबतच गृहव्यवस्थापन प्रक्रियेमध्ये वेळ व उर्जेचे व्यवस्थापन करीत असणाऱ्या स्त्रियांना थकवा न जाणवता त्या उत्साही आढळल्या. पण ज्या स्त्रिया मानवीय संसाधनांचा वापर करून कामे करीत होत्या त्यांची पैसा ही अमूल्य साधनसंपत्ती वाचत होती पण स्वतःच्या प्रकृतीकडे त्यांचे दुर्लक्ष होवून शारीरिक समस्या निर्माण होवून कार्यक्षमता कमी झालेली आढळली. कारण त्या कामे तर करीत होत्या पण त्यांच्या आहार समतोल नव्हता तसेच उर्जेचे व्यवस्थापन त्या करीत नसल्याने विश्रांती कुठे व केंव्हा घ्यावयाची याची त्यांना माहिती नसल्याने थकवा येईपर्यंत त्या कामे करीत होत्या ज्यावेळी काम करूच शकणार नाही अशावेळी त्या विश्रांती घेत होत्या परिणामी

जास्त वेळ विश्रांती घ्यावी लागत होती आणि त्यामुळे त्यांचे वेळेचे व्यवस्थापन पण बरोबर होत नव्हते परिणामी त्यांचे मानसिक स्वास्थ्य दुर्बल होते.

**निष्कर्ष :**

नौकरी करणाऱ्या ज्या स्त्रिया मानवीय संसाधनांच्या वापरासाठी गृह व्यवस्थापन प्रक्रियेचा अवलंब करीत होत्या व सोबतच घरकामासाठी नौकारांचे सहाय्य घेत होत्या त्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास जास्त दिसून आला, तसेच इतर स्त्रियांच्या तुलनेत त्या कमी थकलेल्या दिसल्या.

**संदर्भ :**

डॉ. सौ. क्षमा लिमये-गृह व्यवस्थापन आणि गृहकला, विद्या प्रकाशन नागपूर, पान नं २५ ते ३०

आशा निमकर व क्षमा लिमये-गृह व्यवस्थापन, पान नं ६२ ते ६६

त्रिवेणी फरकाडे-कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन, पिंपळापुरे & पब्लिशर्स पान नं ३३